**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. नवीन प्राप्तिकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार.
2. दिल्ली विधानसभा निवडणुकीत मतदारांची भाजपला पसंती.
3. युवकांनी भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन ठेवावा- नितीन गडकरी, 'ॲडव्हान्टेज विदर्भ 2025' मध्ये स्टार्टअप चर्चासत्र आयोजित.
4. महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पांना वित्तीय सहाय्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्था सकारात्मक, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली व्यापक बैठक.

--------------------------

**नवीन प्राप्तिकर विधेयक**

येत्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणलं जाईल, त्यानंतर ते संसदीय स्थायी समितीकडे पाठवलं जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं सीतारामन यांनी सांगितलं. महागाई असो किंवा विकासाचा मुद्दा असो चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण समन्वयाने आखलं पाहिजे, तरच जनतेला त्याचा लाभ होईल असंही त्या म्हणाल्या.

--------------------------

**दिल्ली निकाल**

भारतीय जनता पार्टीने दिल्ली विधानसभा निवडणुकीत जवळजवळ तीन दशकांनंतर निर्णायक विजयी कौल मिळवला आहे. पक्षाने सध्याच्या घडीला बहुमताचा आकडा ओलांडला आहे आणि विद्यमान आम आदमी पक्षाला पराभूत केलं आहे. दिल्ली विधानसभेच्या 70 जागांपैकी आत्तापर्यंत 56 जागांचे निकाल जाहीर झाले असून भाजपाने 39 जागा जिंकल्या आहेत तर नऊ जागांवर आघाडीवर आहे. आम आदमी पक्षाने 17 जागा जिंकल्या असून पाच जागांवर आघाडीवर आहे. तिसरा प्रमुख पक्ष असलेला काँग्रेसला एकही जागा जिंकता

आलेली नाही. भाजपाच्या प्रमुख विजयी उमेदवारां पैकी परवेश साहिब सिंह नवी दिल्ली मधून, तर्विंदर सिंह मारवाह जंगपुरा मधून तर कपिल मिश्रा कारा वाल नगर यांचा समावेश आहे. तर आपच्या विजयि उमेदवारांपैकी कालकाजी मधून आतिशी विजयी झाल्या आहे. दरम्यान माजी मुख्यमंत्री आणि आप नेते अरविंद केजरीवाल, तसेच मनीष सिसोदिया, सौरभ भारद्वाज यांना पराभवाचा सामना करावा लागला. पराभवाचा स्वीकार करताना आप नेते केजरीवाल यांनी पराभव स्वीकारण्याची प्रतिक्रिया दिली -

*बधाई देता हूँ, और मैं उम्मीद करता हूँ, की जिस उम्मीद के साथ और जिस आशा के साथ लोगों ने उनको बहुमत दिया है वो उन सभी उम्मीदों और आशाओं पे पूरा उतरेंगे। अब जो जनता ने हमें निर्णय दिया है हम ना केवल एक कंस्ट्रक्टिव अपोजिशन का रोल निभाएंगे।बल्कि हम समाजसेवा जनता के सुख दुख में काम आना, व्यक्तिगत तौर पे जिसको भी जो जरूरत होगी हम लोगों के सुख दुख में हमेशा काम आएँगे।*

-------------------------

दिल्ली निकाल प्रतिक्रिया

लोककल्याणकारी योजनांमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेचा विश्वास जिंकला, असं केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी आज मुंबईत सांगितलं. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपानं मिळवलेल्या यशाबद्दल ते बोलत होते. दिल्लीच्या निकाला बद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जनतेचे आभार मानले आहे....

*दिल्ली की जनता ने जो विश्वास किया है भारतीय जनता पार्टी पर वो बहुत महत्वपूर्ण है। पिछले अनेक सालों से दिल्ली के विकास में अनेक अड़चनें पैदा हुई थीं। मेरे डिपार्टमेंट से हम लोग 65,000 करोड़ के काम कर रहे हैं और 35,000 करोड़ के नए काम डिक्लेयर कर रहे हैं। हम दिल्ली को प्रदूषण से मुक्तऔर दुनिया का सबसे सुंदर शहर बनाना चाहते हैं और मेरा विश्वास है कि भारतीय जनता पार्टी के जीत के कारण प्रधानमंत्री मोदी जी के नेतृत्व में दिल्ली की तस्वीर बदलेगी ये मेरा दृढ़ विश्वास है। दिल्ली की जनता ने हमको जो जीत दिलाई है, मैं जनता के प्रति आभार व्यक्त करता हूँ, उनको बहुत बहुत धन्यवाद।*

अरविंद केजरीवाल यांनी प्रामाणिकपणाची भाषा केली, पण प्रत्यक्ष कृती वेगळी होती. मतदारांनी हा फरक ओळखला आणि म्हणूनच मतं घसरली, अशी टीका

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केली. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जनतेची सेवा करणारं सरकार मिळाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीतून भाजपा सरकार दिल्लीचा विकास करेल, असं नवी दिल्लीतले भाजपा उमेदवार परवेश वर्मा यांनी सांगितलं. काँग्रेस आत्मपरीक्षण करेल असं काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या प्रियंका गांधी यांनी पक्षाच्या दारूण पराभवाबद्दल म्हटलं आहे. आपचे मनीष सिसोदिया यांनी पराभव स्वीकारत असल्याचं म्हटलं आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजप पक्षाला घव घवीत बहुमत मिळाल्यावर नागपूर मधील भाजप कार्यालया बाहेर भाजप कार्यकऱ्यांचा ढोल तशा वाजवत जलोष करण्यात आला.

-------------------------

राष्ट्रीय सर्वेक्षण

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे ‘कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च’ या विषयावर राष्ट्रीय सर्वेक्षण होणार आहे. या वर्षभरात ही पाहणी होणार असून, निवडक कुटुंबांनी गेल्या वर्षभरात केलेल्या आरोग्यविषयक खर्चाबाबत माहिती संकलित करण्यात येईल. या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश, शासकीय आणि खासगी दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधा इत्यादीची माहिती गोळा करणं हा आहे. नमुना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

-------------------------

स्टार्टअप-नितीन गडकरी

वर्ष 2047 मध्ये भारत विकसित राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर पुढे यावे, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. त्यासाठी स्टार्टअप मोठी भूमिका बजावू शकतात. त्यामुळे या क्षेत्रातील युवकांनी भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन ठेवावा, असा सल्ला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित ॲडव्हान्टेज विदर्भ-2025 खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ‘स्टार्टअप क्षेत्रातील उद्यमशीलतेचा विकास’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना नितीन गडकरी यांनी, स्टार्टअपच्या क्षेत्रात अनेकांनी हिमतीने काम

करीत मोठे उद्योग उभे केले. या उद्योगांची गुणात्मक वाढ होऊन त्यातून रोजगार, स्वयंरोजगार आदी निर्माण होतील व विदर्भ समृद्धीच्या दिशेने वाटचाल करेल, ही खात्री आहे. ॲडव्हान्टेज विदर्भचा हाच मुख्य उद्देश आहे, असेही स्पष्ट केले. यानंतर व्हिजन एव्हिएशन सत्राला गडकरी संबोधित करत आहे. हरित इंधन बद्दल बोलताना ते म्हणाले कि....

*और २०७० तक हम कार्बन न्यूट्रल देश बनने की कोशिश कर रहे हैं तो उसके लिए बहुत आवश्यक है। जहाँ तक एनर्जी के सेक्टर की बात है, हम लोग जो थर्मल कोल से एनर्जी बनाते हैं। अब वर्ल्ड में इसके बारे में काफी बड़ी चर्चा हो रही है क्योंकि कार्बन डाइऑक्साइड के कारण विशेष रूप से जो एयर पोलुशन की समस्या है उसके कारण अब पारंपरिक ऊर्जा के स्त्रोत की तरफ पूरी दुनिया आगे बढ़ रही है।*

---------------------------

ॲडव्हान्टेज विदर्भ समारोप

केंद्रीय मंत्री आणि मुख्य संरक्षक नितीन गडकरी यांच्या संकल्पेनतून साकारलेल्या व असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) द्वारे आयोजित 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ - खासदार औद्योगिक महोत्सव' चा उद्या ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:०० वाजता समारोप होत आहे. कार्यक्रमाला केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, मुख्य संरक्षक नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रफुल्ल पटेल, संजय राठोड, ॲड. आशिष जयस्वाल, पंकज भोयर आणि इंद्रनील नाईक यांची उपस्थित राहणार आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात तीन दिवसांपासून विदर्भाच्या मेगा इंडस्ट्रियल एक्स्पो, बिझनेस कॉन्क्लेव्ह आणि इन्व्हेस्टमेंट समिट सुरू आहे. उद्या  हॉली बी मध्ये दुपारी 12 वाजता शासकीय ई मार्केटप्लेस (जीइएम) चे विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. तत्पूर्वी हॉल बी मध्ये 10.30 वाजता भारतीय भांडवली बाजाराच्या कार्याचे नियमन करणा-या सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी)चे 'हाऊ टू बिकम ए स्मार्ट इन्व्हेस्टर' विषयावर विशेष सत्र होणार आहे.

---------------------------

नदी जोड

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या जलसमृद्धीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या नारपार सिंचन प्रकल्प, मराठवाडा वॉटरग्रीड योजना, समृद्धी

महामार्गावरील गुणवत्तापूर्ण परिवहन व्यवस्था प्रकल्प, दमनगंगा-एकदारे-गोदावरी योजनेला वित्तीयसहाय मिळण्यासाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट बँक, कोरियन एक्झिम बँक व एएफडी यांच्यासमवेत चर्चा केली. या प्रकल्पांच्या वित्तीय सहाय्याबाबत मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला तिन्ही वित्तीयसंस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या बैठकीत नारपार सिंचन प्रकल्प, मराठवाडा वॉटरग्रीड योजना, समृद्धी महामार्गावरील गुणवत्तापूर्ण परिवहन व्यवस्था प्रकल्प, दमनगंगा-एकदारे-गोदावरी योजना याबाबत सादरीकरण करण्यात आले. एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट बँकेचे उपाध्यक्ष हुन किम यांनी या प्रकल्पाबाबत आम्ही सर्वतोपरी सहाय्य करु, असे सांगितले. तापी रिचार्ज योजनाबाबत मध्यप्रदेश मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली असून त्यांनी या प्रकल्पाबाबत सकारात्मकता दर्शविल्याची माहिती सिंचन विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी दिली. दूरदृश्यप्रणालीद्वारे त्यांनी बैठकीत सहभाग घेतला.

---------------------------

तापमान

विदर्भात सर्वात कमी किमान तापमान भंडारा इथं 15 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं,तर सर्वाधिक कमाल तापमान वाशिम इथं 34.2 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. नागपुरात 16 पूर्णांक तीन अंश सेल्सिअस इतकं, किमान तापमान तर 30 पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे.

---------------------------